# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.11.2025** **वार- रविवार**

---

**बालभारती पौडफाटा**

पुण्यातील बालभारती ते पौड फाटा या नियोजित मार्गाचा आराखडा तयार करून बराच कालावधी लोटला असल्याने सध्याची गरज लक्षात घेऊन नव्याने आराखडा तयार करण्यात येत आहे. यामध्ये रस्ता, उन्नत रस्ता आणि बोगदा अशा विविध पर्यायांचा विचार केला जाणार असल्याची माहिती पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. न्यायालयाच्या निर्णयानुसार रस्त्यासाठी पर्यावरणीय परवानगी घेण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.

**कर्करोग स्कॅन**

कर्करोगाच्या तपासणीसाठीची बंद असलेली ससून रुग्णालयातील पेट स्कॅन तपासणी आता पुन्हा सुरू झाली आहे. खासगी रुग्णालयात किंवा स्वतंत्र 'पेट स्कॅन' केंद्रात ही तपासणी करण्यासाठी 15 ते 25 हजार रुपये खर्च येतो. परंतु, सासून रुग्णालयात ही तपासणी पाच हजारांत होत असल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. शुक्रवारपासून रुग्णांची तपासणीदेखील सुरू झाली असून, आर्थिक दुर्बल रुग्णांच्या आर्थिक परिस्थितीचे मूल्यमापन करून त्यांची तपासणी मोफत केली जात असल्याची माहिती रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लपा जाधव यांनी दिली आहे.

**जावडेकर**

तरुणांनी आपल्या बौद्धिक क्षमतेचा वापर आपल्या देशाच्या विकासासाठी अधिक प्रमाणात करावा असा सल्ला माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश जावडेकर यांनी तरुणाईला दिला आहे. ते आज दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्यावतीने सनदी लेखापाल विद्यार्थ्यांसाठी पुण्यात आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनावेळी बोलत होते. या परिषदेत देशभरातून 2000 पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

**बालकुमार**

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था या बाल साहित्यातील मातृसंस्थेचा सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभ विविध उपक्रमांनी येत्या बालदिनानिमित्त होणार आहे.
पुण्यातील नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात सकाळी 10 वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री गिरीश प्रभुणे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. बालकुमार सुवर्णगाथा स्मरणिकेचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते केले जाणार असल्याची माहिती संस्थेचे कार्यवाह प्रसाद भडसावळे, संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू आणि कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे दिली आहे.

**<u>पुणे जमीन</u>**

पुण्यातल्या कोरेगाव पार्क आणि बोपोडी जमीन व्यवहार प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. या व्यवहारातली कुलमुखत्यारपत्रधारक शीतल तेजवानी परदेशात पळून गेल्याची चर्चा असली तरी त्याला पोलिसांनी दुजोरा दिलेला नाही. या प्रकरणांतली कागदपत्रं संबंधित शासकीय विभागाकडून मागवण्यात आली असून पडताळणीनंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान या प्रकारणात कुठलाही आर्थिक व्यवहार झाला नसल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>वंदेमातरम</u>**

“वंदे मातरम्” ला 150 वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने, भारतीय जनता पक्ष पुणे शहराच्यावतीने आयोजित वंदे मातरम् गौरव यात्रा काल अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात पार पडली. या यात्रेस केंद्रीय हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, आमदार भीमराव तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे उपस्थित होते.

**<u>बाजार</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने भेंडी, वांगी, काकडी, गाजर, भुईमूग शेंग, घेवडा आणि गवार यांच्या भावात वाढ झाली तर आवक वाढल्यानं मटार स्वस्त झाले आहेत. थंडीमुळे सर्वच पालेभाज्यांच्या भावात वाढ झाली आहे. फळबाजारात संत्री, कलिंगड, खरबूज, पपई आणि सीताफळ यांचे भाव वधारले आहेत तर गोणीमागे लिंबांच्या भावात दहा टक्क्यांपर्यंत घसरण झाली आहे. लग्नसराईमुळे फुल बाजारात शोभिवंत फुलांना मागणी असून सर्व फुलांचे भाव आणि आवक स्थिर आहे.

**आग**
आज दुपारी पुण्यातील धनकवडी इथल्या ज्ञानेश्वर हाउसिंग सोसायटीच्या एका इमारतीच्या सहाव्या मजल्यावर घरामध्ये गॅस गळती होऊन आग लागली होती. अग्निशमन दलाकडून आग विझवण्यात आली.

**क्रीडा**
पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांसाठी आंतरसहकारी बँक सहकार करंडक क्रिकेट स्पर्धेत काल उपांत्यपूर्व फेरीचे सामने पार पडले. पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राजर्षी शाहू सहकारी बँक, कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक यांनी उपांत्य फेरीत धडक मारली.

प्रमोद मुळ्ये स्मृती चौथ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत 75 वर्षावरील गटात मुंबई महानगर जिल्हा संघाच्या पिनाकिन संपत यांनी अजिंक्यपद पटकावले तर पुण्यातील दिलीप कुडतरकर यांना उपविजेतेपद मिळाले. पुरुषांच्या सांघिक विभागात नागपूर ऑरेंज संघ विजेता ठरला.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 तर किमान तापमान 14 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या आकाश मुख्यत: निरभ्र राहील असा अंदाज हवामान विभगाने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**